एखाद्या विशिष्ट भागाचा राजकीय, आर्थिक, सामाजिक अभ्यास करीत असताना त्या भागाची भौगोलिक स्थिती प्रथम आपणास अभ्यासावी लागते. कारण हेन्री बकल म्हणतात की, **"The type of man and society is influenced by the general aspects of nature."** म्हणजे भौगोलिक परिस्थितीचा व्यक्ती व समाजावर प्रभव पडत असतो. विद्यमान रायगड जिल्हा अरबी समुद्रकिनाऱ्यावर 17 51' उत्तर ते 19 80' उत्तर अक्षांश आणि 72 51' पूर्व ते 73 40' पूर्व रेखांश यामध्ये पसरलेला आहे. जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी सुमारे 150 कि.मी. व पूर्व-पश्चिम रुंदी सुमारे 24 ते 48 कि.मी. आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ

7,148 चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या क्षेत्रफळाच्या 2.32 टक्के आहे. जिल्ह्याचे स्थान सागर किनारी, मध्य कोकणात आहे. घड्याळाच्या काट्याच्या दिशेत ठाणे, पुणे, सातारा, रत्नागिरी हे जिल्हे येतात. पश्चिमेस अरबी समुद्र, वायव्येस ठाण्याची खाडी, त्यापलीकडे बृहन्मुंबई जिल्हा आहे. रायगड जिल्ह्याची पूर्व सीमा सह्याद्री पर्वताच्या लहान मोठ्या रांगामधुन जाते.

प्राकृतिक रचना :

उंचसखलपणा हे रायगड जिल्ह्यातील प्राकृतिक भूस्वरूपाचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा पश्चिमेकडे समुद्रापर्यंत भूशिरासारख्या पसरलेल्या आहेत. नद्या व प्राकृतिक रचनेनुसार जिल्ह्याचे तीन विभाग पडतात.

अ. उत्तर रायगड :

या विभागातील तीन मुख्य नद्यांपैकी उल्हास ही एक होय. ती वसई खाडीला मिळते. पनवेल नदी पनवेल शहराजवळून वाहत जाऊन पनवेल खाडीला मिळते. रायगडच्या उत्तर भागातून पनवेल नदी समूहातील लहान नद्या कामरंग, कासाडी, काळुंद्री नैऋत्येकडे वाहतात. सह्याद्री पर्वतातून खंडाळ्यापासून निघणाऱ्या डोंगरांच्या रांगांमुळे रायगड जिल्ह्यातील उल्हास नदीचे खोरे पनवेल व पाताळगंगा नद्यांच्या खोऱ्यापासून वेगळे झाले आहे.

पाताळगंगा नदी खंडाळ्याजवळ सह्याद्रीच्या पश्चिम कड्याजवळ उगम पावते. दक्षिणेकडे पाताळगंगेचे व बालगंगेचे पाणलोट क्षेत्र विभागणारी आणि वायव्येकडून आग्नेयकडे पसरलेली 572,41 मी. उंचीची माणिकगडची रांग आहे. कर्नाळा किल्ल्याचीही डोंगररांग आहे. पुढे पाताळगंगेचे खोरे रुंद बनत जाऊन ती धरमतर खाडीला मिळते. बालगंगा नदी पाताळगंगा नदीला जवळ जवळ समांतर परंतु जास्त डोंगराळ प्रदेशातून वाहत जाऊन धरमतर खाडीलाच मिळते. भोगावतीही बालगंगेला समारंतर वाहत जाते.

अंबा नदी खंडाळ्याच्या दक्षिणेस उगम पावून नागोठणे जवळ धरमतर खाडीस मिळते. छोट्या-मोठ्याडोंगररांगातून ही नदी वाहते. नागोठण्यापासून या नदीच्या खोऱ्याचा तळ रुंद होतो. सुधागड, सागरगड व सरसगड ही ऐतिहासिक ठिकाणे याच भागात आहेत. अंबा नदीच्या पश्चिमेला रेवसपासून रेवदंड्यापर्यंत पसरलेला किनारी प्रदेश बराचसा सपाट आहे. उत्तरेकडील अंबा नदीचे खोरे दक्षिणेकडील कुंडलिका नदीच्या खोऱ्यापासून अलग करणारी सागरगड कनकेश्वर डोंगररांग या भागाला दुभांगते. रेवस व धरमतर पर्यंत विस्तृत दलदलीचा प्रदेश पसरलेला आहे.

ब. मध्य रायगड :

कुंडलिका आणि मांदाड या दोन नद्या मध्य रायगडमधुन वाहतात, कुंडलिका ही सह्याद्रीच्या पश्चिम उतारावर उगम पाऊन रेवदंड्याजवळ अरबी समुद्राला मिळते. नदीचे कोलाडनंतर पात्र थोडे रुंद होते. दक्षिण तीरावर विस्तृत दलदलीचा प्रदेश तयार झाला असुन मुखाजवळ कोरलई किल्ला आहे. तसेच रेवदंड्याचा भग्नावस्थेतील पोर्तुगीजांचा किल्ला आहे. कुंडलिका नदीला मार्गत दोन उपनद्या रामराज व बाळे येऊन मिळतात. भिरा येथे विद्युत निर्मिती केंद्र आहे.

मांदाड ही तुलनेने लहान नदी असुन माणगावच्या पठारावर तिचा उगम होतो. ही नदी राजापुरी-म्हसळा खाडीला मुरूडच्या दक्षिणेस मिळते. म्हसळा खाडीचा प्रवाह अतिशय अरुंद असुन त्याच्या दोन्ही किनाऱ्यावर विस्तृत पसरलेले चिखलमय सखल प्रदेश आहेत. मुखाजवळ प्रसिद्ध जंजिरा किल्ला आहे.

क. दक्षिण रायगड :

या भागातून सावित्री व तिच्या घोड, गांधारी, काळ आणि नागेश्वरी या चार उपनद्या वाहतात. या भागातील आग्नेयेस भूरचना उंचसखल असून महाडच्या उत्तरेस इतिहास प्रसिद्ध रायगड किल्ला आहे. पोलादपूर पर्यंत सावित्री नदी डोंगराळ प्रदेशातून वाहते. पोलादपूरपासून राजवाडीपर्यंत नदीचे खोरे थोडे रुंद

असल्यामुळे दोन्ही तीरांवर थोडी लागवडी योग्य जमीन आहे. महाडच्या सभोवतालची जमीन सुपीक असून मोठ्या प्रमाणावर शेतीखाली आहे. सावित्रीला एकूण सहा उपनद्या येऊन मिळतात. त्यापैकी थोड, कामठी, काळ, गांधारी या उजवीकडून तर चोला व नागेश्वरी या डावीकडून मिळतात. निजामपूर-काळ नदीवर माणगांव जवळ इ.स. 1871, इंदापूर जवळ इ.स. 1919 व भावे येथे इ.स. 1933 ला झालेले असे ब्रिटीश काळातील पूल आहेत. याचा पुढे स्वातंत्र्य आंदोलनाशी संदर्भ येतो. सावित्री नदीवर पनवेल-महाड-पणजी मार्गावर महाड जवळ पूल इ.स. 1928 ला बांधला आहे.

प्राकृतिक भाग :

1) डोंगररांगा :

जिल्ह्यात सह्याद्री पर्वतामुळे डोंगररांगा निर्माण झालेल्या आहेत. जिल्ह्याची ईशान्य सीमा सह्याद्रीच्या पायथ्याजवळील डोंगरामधुन व एका उपशाखेवरून जाते. दक्षिण भागात मात्र जिल्ह्यांची सीमा सह्याद्रीच्या माथ्यावरून जाते. दऱ्यामध्ये सदाहरित जंगले आहेत. बोर, वरंधा व आंबेनळी हे तीन घाट आहेत. विविध खिंडी आहेत. वायव्येकडील किनारपट्टीचा प्रदेश सोडला तर जिल्ह्याचा इतर भाग इतका डोंगराळ व गुंतागुंतीचा आहे की, अनेक लहान लहान डोंगरामधुन निश्चित डोंगररांगा ओळखणे अवघड आहे. कर्नाळा, रतनगड, सागरगड, माथेरान, सुकेली, डोंगररांग, रायगड किल्ला असे उंचवटे आहेत.

2) सह्याद्रीचा पायथा :

सह्याद्रीच्या पायथ्याजवळ उंचसखलपणामुळे शेती व्यवसाय मागासलेली आहे. विखुरलेला वनाच्छादित लहान भाग सोडता इतर भाग उजाड आहे. भिवपुरी, खोपोली आणि भिरा येथे जलविद्युत प्रकल्प ब्रिटिशकाळापासून आहेत.

3) मध्यवर्ती अंतर्गत प्रदेश :

पश्चिम किनारपट्टी व सह्याद्री रांगा यामधील 20 ते 30 कि.मी. रुंदीचा दक्षिणोत्तर पसरलेल्या या भागात खुरटी झुडपे आणि विखुरलेले पानझडी जंगलाचे पट्टे आहेत. पावसाळ्यात भरपूर पाणी असते मात्र उन्हाळ्यात दुभिक्ष्य असते. हा प्रदेश पावसाळ्यात हिरवागार परंतु उन्हाळ्यात मात्र रखरखीत असतो. अंबा आणि कुंडलिका नद्यांच्या खोऱ्यातच शेती व्यवसाय व लोकसंख्या केंद्रित झाली आहे. छोट्या-छोट्या जमिनीच्या तुकड्यांवर शेती केली जाते.

4) किनारपट्टीलगतचा प्रदेश :

कर्जत-खोपोलीच्या वायव्येस पनवेलचा सपाट प्रदेश आहे. येथे डोंगरांची उंची कमी होत जाऊन ते सपाट मैदानी प्रदेशात सामावले जातात. या सपाट प्रदेशात भातशेती केली जाते. पनवेलपासून उरणकडे छोट्या-मोठ्या टेकड्या आहेत. उरणच्य दक्षिणेला समुद्रापर्यंत गेलेली डोंगरांची भूशिरे आणि सपाट वालुकामय प्रदेश यांनी व्यापलेला अलिबागच्या किनारपट्टीचा प्रदेश आहे. या भागात नारळ-पोफळीच्या बागा, भातशेती केली जा. सपाट शेतजमिनी आणि कमी उंचीचे उजाड पठारमाथे असा किनारी भूप्रदेश आहे. भात, नाचणी, भाजीपाला, कडधान्ये इत्यादी पिके घेतली जातात. मच्छीमारी केली जाते. डोंगरपायथ्यांशी शेत जमिनीच्या कडेला खेडी वसलेली आहेत.

**संकलक - वैष्णव पाटील**

(एस.वाय.बी.ए.)

(आभार - प्रा,डॉ.बबन जाधव)

संदर्भ-रायगड जिल्ह्यातील

स्वातंत्र्य चळवळ : शेतकऱ्यांचा सहभाग

# भाई कोतवाल

विठ्ठल लक्ष्मण कोतवाल उर्फ भाई कोतवाल हे रायगड जिल्ह्यातील समाजसेवक व स्वातंत्र्यसेनानी होते. त्यांनी सशस्त्र क्रांतीचाही अवलंब केला. ते समाजसुधारक आणि क्रांतिकारक होते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली.

## जन्म व शिक्षण

हुतात्मा भाई कोतवाल यांचे माथेरान हे जन्मस्थान होय. एल.एल.बी. झालेल्या भाईंनी देशप्रेमाने प्रभावित होऊन स्वतःला देशकार्यास वाहून घेतले. विठ्ठल कोतवाल यांचा जन्म 1 डिसेंबर 1912 रोजी रायगड जिल्ह्यातील मुंबजवळील माथेरान येथे झाला. स्थानिक शाळेत शिकल्यावर चौथ्या इयत्तेपर्यंत ते तिथेच राहिले आणि 1936 मध्ये पुण्यातून पदवी प्राप्त केल्यानंतरच ते परत आले. ते सर्वात मोठे होते आणि त्यांना तीन बहिणी होत्या. स्थानिक शाळेत चौथी इयत्तेपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर तो पुण्याला तिची मावशी गौरुताई हळदे यांच्याकडे गेला, जिथे त्याने वाडिया महाविद्यालयातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्याच्या व्हर्नाक्युलर मेट्रिक परीक्षेत तो संपूर्ण पुणे जिल्ह्यात पहिला आला. ते मूळ गावी परतल्यानंतर त्यांनी मुंबईत कायद्याचे शिक्षण घेतले आणि 1941 मध्ये ते वकिल झाले.

## सामाजिक कार्य

भारताच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञान अज्ञात क्रांतिवीरांनी ब्रिटिशांविरुद्ध लढा देऊन बलिदान केले. त्यामध्ये हुतात्मा भाई कोतवाल आणि त्यांच्या आझाद दस्त्याचे कार्य फार मोलाचे आहे. तो काळ फार धामधुमीचा होता. दुसऱ्यामहायुद्धाचा वानवा शिगेला पोहचला होता. असं असतांनाही ब्रिटिश भारतीयांच्या स्वातंत्र्याच्या मागणीपुढे झुकायला तयार नव्हते. 8 ऑगस्ट 1942 रोजी आझाद मैदान येथील भाषणात महात्मा गांधींनी ब्रिटिशांना 'भारतातून चालते व्हा!'' असे ठणकाहून सांगितले व देशवासीयांना 'करेंगे या मरेंगे'चा मंत्र देऊन, शेवटच्या लढ्यासाठी तयार राहण्याच आवाहन केले, त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो देशप्रेमी या लढ्यात सहभागी झाले. याच 1942 च्या 'चले जाव' चळवळीतील एक धगधगते अग्निकुंड म्हणजे वीर हुतात्मा भाई कोतवाल.

उसळत्या रक्ताने मातृभुला परवशेतच्या पाशातून मुक्त करण्यासाठी आपल्या सर्वस्वाच बलिदान देणाऱ्या मातृभूमीच्या या महान सुपूत्राचा जन्म 1 डिसेंबर 1912 रोजी आताच्या रायगड जिल्ह्यातील माथेरान येथे झाला. अनंत अडचणी व अडथळे पार करत, अत्तीउच्च धैर्य दाखवत, अपार परिश्रम करून ते बॅरिस्टर झाले. माती आणि माता यांच्याशी एकरुप होणं हा त्यांचा जन्मजात स्वभाव असल्याने मातृभूमीला परकियांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात झेप घेतली. देशाबद्दल ज्वलंत अभिमान आणि गुलामगिरीच पराकोटीचा तिटकारा यामुळे परकीयांच्या नोकरीचे जोखड पेलण्यापेक्षा समाज जागृत करण्यासाठी त्यांनी सामाजिक रुढी व जुनाट परंपरा या विरोधात लोकांमध्ये जागृती निर्माण केली, त्यांना अन्यायाच्या प्रतिकारार्थ लढण्यासाठी धैर्य दिले. सर्वसामान्यांना तन, मन व धनाने सशक्त केलं. समाजाला आर्थिक शिस्त लागावी यासाठी स्वतःच्या बहिणीचं राधाबाईच लग्न केवळ सत्तर रुपयात करुन समाजात अनोखं स्थित्यंतर घडविले. सामाजिक प्रबोधनाच्या व परिवर्तनाच्या त्यांच्या या कार्यकृतीमुळे लोक त्यांना आदराने अण्णा म्हणू लागले.

वर्षानुवर्षाच्या गुलामगिरीची सर्वांनाच इतकी सवय झाली होती की देव, देश, धर्म हा विचार जणू काही लोप पावला होता. सारे राष्ट्र अगतिक व निराधार झाले होते. अखंड चालणाऱ्या पिळवणुकीमुळे दारिद्रे अपार वाढले होते. राष्ट्रातील सारी प्राणयात नष्ट झाली होती. अशावेळी हिंदपूत्रांमध्ये नवतेज निर्माण करण्यासाठी यांच्यात स्वातंत्र्य लालसा जागृत करण्यासाठी अण्णांनी त्यांना संघटित करण्यास सुरुवात केली. गरीब शेतकऱ्यांना, कष्टकऱ्यांना जागृत करायचे. अज्ञानाच्या पाशातून त्यांना बाहेर काढायचे तर सर्वप्रथम त्यांना शिक्षण दिले पाहिजे या विचारांनी त्यांनी बाळासाहेब

ठोसर यांच्या सहकार्याने कर्जत तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करुन 42 व्हॉलंटरी शाळा सुरु केल्या. शेतकऱ्यांना सरंजमशाहीच्या दृष्ट चक्रातून बाहेर काढण्यासाठी, गोरगरिबांची होणारी उपासमार थांबविण्यासाठी, धान्यतुटवडा टाळण्यासाठी भाऊसाहेब राऊत यांच्या मदतीने 'धान्यकोठी' ही अभिनव योजना सुरु केली. वकिलीचा माध्यमातून जुलमी सावकारांच्या नांग्या ठेचल्या. पतपेढी, वाचनालय व व्यायामशाळांच्या माध्यमातून समाज सुसंघटित व सामर्थशाळी बनविला.

चलेजाव चळवळीतील 'करेंगे या मरेंगे' या आदेशाने आपल्या सहकाऱ्यांसमोर आवाहन केले. ''स्वराज्य हवे असेल तर आपण आपल्या सर्वस्वाच बलिदान देण्यास तयार रहा.'' आणि या आवाहना सरशी गुलामगिरीचे सर्व पाश उध्वस्थ करत देशभक्तीचे एक दैदिप्यमान पर्व सुरू झाले, यातूनच पुढे क्रांतिकारकांच्या पुरुषार्थाची गाथा उभी राहिली. लोहकण जसे लोहचुंबकाकडे आकर्षिले जातात, तसेच अण्णांच्या उत्युंग व्यक्तिमत्त्वामुळे आणि प्रभावी नेतृत्व गुणांमुळे त्यांना असंख्ये सहकारी मिळाले. त्यातूनच पुढे निधड्या छातीचा कोतवाल गट अर्थात 'आझाद दस्ता' तयार झाला. या आझाद दस्त्याच, स्वतःभाई उर्फ अण्णासाहेब कोतवाल, गोमाजी पाटील, हिराजी पाटील, झिपरु गवळी, राघो नागो भगत, धोंडू देसाई, मारुती शेलार, धाकू डुकरे, काळू दळवी, नथू भोईर, वामन भोईर, देहू कानोजे, राघो गाडे, आप्पा शेंडे, भास्कर तांबट, उत्तरेतील रामलाल श्रीवास्तव, दक्षिणेतील गोपाळ शेट्टी, कांतरा शेट्टी, काठेवाडचा शशीलाल दलाल, राजकोटाचा चंद्रकांत गुजराथी आणि इक्या पुतळ्या कातकरी ही होता. असे अनेक, अनेक जातीचे, धर्माचे, पंथाचे, वेगवेगळ्या प्रांतातील भिन्न भाषा बोलणारे देशभक्त एका उदात्त ध्येयासाठी एकत्र आले. 'आपण सारे एक आहोत. आपले विचार एक आहेत. आपलं हृदय ही एक आहे. आपण आपलं ध्येय नक्कीच साध्ये करु. आपण सारे मिळून परकीय शत्रूला देशातून हुसकावून लावू, या जाणिवेतून  हे मातृभक्त इंग्रजांविरुद्ध लढू लागले. ब्रिटिश शासनाला जेरीस आणण्यासाठी सरकारी कचेरीवर हल्ला करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वे रुल उखडणे, विजेचे पायलन पाडणे अशी कितीरी जीवावरची कामे हे क्रांतीवीर करु लागले. स्वातंत्र्य संग्रामात इरेला पेटलेले हे वीर ब्रिटीशांच्या जाळ्यात अडकणे केवळ अशक्यच. कधी रानावणातून, कधी नदीपात्रातून तर कधी डोंगर वस्त्यांतून आश्रय घेत ते ब्रिटीशांना गुंगारा देत होते.

ऑगस्ट क्रांतीचा वनवा आता शिगेला पोहचला होता. इंग्रजांच्या साम्राज्याला सुरुंग लावणाऱ्या आझाद दस्त्याने शिवरायांच्या गनिमी काव्याचा अवलंब करून सिद्धगडचा आश्रय घेतला आणि मराठेशाहीच्या साडेतीनशे वर्षानंतर पुन्हा एकदा सिद्धगड जागा झाला, परंतु पुन्हा एकदा गद्दारीचा कोळसा उगळला गेला. क्रांतिकारकांच्या वस्तीस्थानाच्या बातम्या इंग्रजांना पुरवल्या गेल्या. आझाद दस्त्याच्या ठाव-ठिकानाचा सुगावा अखेर इंग्रजांना लागला आणि 2 जानेवारी 1943ची ती रात्री क्रांतिकारकांसाठी काळरात्र ठरली. मुरबाडच्या लाल मातीत आपल्या लाल रक्तानं लाल क्रांती करुन वीर हुतात्मा भाई कोतवाल व वीर हुतात्मा हिराजी गोमाजी पाटील यांनी भारत मातेला स्वातंत्र्याचा अभिषेक घातला. लाख मोलाच्या दोन नरवीरांच्या रक्तानं सिद्धगडची माती पवित्र पावन झाली. मुरबाडच्या मातीतील सिद्धगड हे या जगातील अमृतालाही अमर करणार क्रांतीतीर्थ आहे. जगाच्या पाठीवर अनेक तीर्थक्षेत्र असतील पण मानवी अंतरंगात जाज्वल्य देशभक्ती निर्माण करणारं, कसं जगावं आणि कशास्तव मरावं हे सांगणार सिद्धगडासारखं स्फूर्ती स्थान नाही. मातृभूमीच्या मुक्तीसाठी आपल सर्वस्व अर्पण करणारे आमचे हे युगपुरुष न्यानी होते, विवेकी होते, विचारी होते, मानवतेचा कैवार घेणारे ते मानवतावादी होते, समाजसुधारनेचा पाया घालणारे ते समाजवादी होते आणि स्वर्गाहूनही स्वातंत्र्ये प्रिय असणारे क्रांतीवादी होते. राष्ट्रसंकट ओढवल्यावर त्या विरोधात लढावं कस, शत्रूशी भिडाव कस याचा धडाच आमच्या या शूरवीरांनी सिद्धगडच्या लाल मातीत गिरवला आहे. त्यांच्या रक्तामासमान या मातीच पावित्र्य भस्मात रुपांतर झाले आहे.

बलिदानाची ही गाथा अमर आहे. तुम्ही आम्ही आज मुक्त आहोत, स्वतंत्र आहोत कारण सिद्धगडच्या मातीत त्यांनी आपलं रक्त सांडल आणि गुलामगिरीच्या भोगातून स्वातंत्र्याचा योग आमच्या झोळीत दान केला. मुक्तीची ही ज्योत कायम ठेवत ठेवण्यासाठी कोणतीही किंमत चुकवावी लागली तरी चालेल. भारतभूला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हुतात्मा भाई कोतवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सकळ सुखाचा त्याग केला. केवळ सुखभोगच नाही तर सतीप्रमाणे त्यांनी आपले प्राणही सहज झुंगारुन दिले. म्हणूनच तर तुम्हा आम्हाला हेवा वाटावा असा इतिहास निर्माण झाला. आमच्या या नरवीरांनी स्वर्गाहूनही स्वातंत्र्य प्रिय मानलं, त्यासाठी आपल्या सर्वस्वाचही प्रसंगी दान केलं. आम्हालाही स्वातंत्र्याची किंमत चुकवावी लागेल. आणि ती किंमत म्हणजे देशाप्रती समर्पण, कर्तव्यतत्परता आणि जबाबदारीची जाणीव.

## स्वातंत्र्य लढा

पुण्यातील महाविद्यालयीन जीवनापासून स्वातंत्र्यलढ्यासाठी प्रेरित असले तरी, विठ्ठल यांच्यावर देशातील सामाजिक कम्युनिस्ट चळवळीचा प्रभाव पडला. त्यामुळे त्यांना कॉमेडचा भारतीय प्रतिशब्द म्हणून ''भाई'' असे संबोधले जात आसे. 9 ऑगस्ट 1942 रोजी महात्मा गांधींनी ब्रिटिशांना ''भारत सोडा'' असे सांगितले तेव्हा ते पूर्णपणे गुंतले आणि भूमिगत झाले. भारतातील सर्व प्रमुख नेत्यांच्या अटकेनंतर भाई कोतवाल यांच्या नावाने अटक वॉरंटही जारी करण्यात आले. ''माझ्या स्वातंत्र देशात किंवा स्वर्गात राहण्याची'' शपथ घेऊन तो त्याच दिवशी भूमिगत झाला. तेव्हा ते माथेरानचे उपाध्यक्ष होते.

भूमिगत असताना त्यांनी रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ''कोतवाल दास्ता'' नावाच्या भूमिगत भाडोत्री सैनिकांचा गट तयार केला. शेतकरी आणि स्वयंसेवी शाळेतील शिक्षक आणि त्यांचे चुलत भाऊ पेंटण्णा आणि दत्तोबा हळदे यांच्यासह त्यांची संख्या सुमारे 50 होती. त्यांनी मुंबई शहराला वीजपुरवठा करणारे विजेचे तोरण तोडण्याचा निर्णय घेतला. सप्टेंबर 1942 ते नोव्हेंबर 1942 पर्यंत त्यांनी 11 तोरण पाडले आणि उद्योग आणि रेल्वे ठप्प झाली.

या धमकीचा मुकाबला करण्यासाठी पोलिसांनी भाई कोतवालला अटक करण्यासाठी 2500 रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले. तसेच भाई कोतवालचा मुकाबला करण्यासाठी विशेष अधिकारी डीएसपी आर. हॉल आणि ऑफिसर स्टाफर्ड यांना पाचारण करण्यात आले.

क्रांतिकारी कोतवाल दस्ता मुरबाड तालुक्यातील सिद्धगडच्या दुर्गम जंगलात लपून बसला असताना त्याने मदतीचे पत्र पाठवले जे तेथील एका जमीनदाराच्या हाती लागले आणि त्याने ते पत्र व संदेशवाहक अधिकारी दालनाकडे वळवले. क्रांतिकारी म्हणतो त्याचा भारतीय सैनिक 2 जानेवारी 1943 रोजी पहाटे आझाद दस्ता दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी जाण्याच्या तयारीत होता आणि मदत येण्याची वाट पाहत होता तेव्हा हॉल आणि स्टॅफर्ड यांनी दस्ता सदस्यांवर हल्ला केला. आझाद दस्ताचे उपनेते गोमाजी पाटील यांचा मुलगा हिराजी पाटील हे पहिले पडले. यात हिराजीचा जागीच मृत्यू झाला. भाई कोतवाल यांच्या मांडीला दुखापत झाल्याने त्यांना हालचाल करता आली नाही. हॉलने त्याला पाइंट ब्लँक मारले.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या अनेक कमी ज्ञात स्वातंत्र्यसैनिकांपैकी ते एक होते. त्याच्या शूर लढ्या आणि बलिदानासाठी त्याला आता अभिमानाने ''वीर भाई कोतवाल'' म्हणजेच योद्धा म्हटले जाते.

**केवल पाटील**
एस. वाय .बी.ए.

# आजचं उरण

रायगड जिल्ह्यातील उरण हे तालुक्याचे ठिकाण 1986 सालानंतर आजही कालच्या उरणच्या छटा तशाच राहिल्या आहेत. 18 गावांची शेतजमीन आपल्या बांधांमध्ये पिकणाऱ्या भाताच्या शेतामध्ये शेतात बाळगणाऱ्या मासळीसह शेतकऱ्यांना शेतकऱ्यांच्या मुलांना आनंद होतो. उत्तर, पश्चिम, दक्षिण आणि खोपटे गावाजवळ उरणच्या मध्यभागात मिठाचे आगर चांदीसारखे उन्हात चमकत होते तर पावसाळ्यात गवतानं साकारल्यामुळे गवताच्या घराच्या छताप्रमाणं दिसत होते. गाड्यांची वर्दळ अद्याप न वाढल्यानं सारे रस्ते कालच्या प्रमाणेच रोडावलेलेचं होते. उरणातील डोंगरटेकड्या अद्याप हिरव्या आणि न तुटलेल्या न कापलेल्या उभ्या होत्या. करंजा खाडी, खोपट्याची खाडी, शेवा गावजवळची न्हावा खाडी, पाणजे मागची खाडी (खोची) यामध्ये कसलाही बदल न झाल्यामुळे साऱ्या खाड्यामधील प्रवाह अधिक प्रदूषित न होता वाहत होत्या. तालुक्याची लोकसंख्या नैसर्गिक वाढीप्रमाणे सामान्य प्रमाणेच वाढत होती. लोकांची आर्थिक स्थिती मागील चार पाच वर्षाप्रमाणेच नागरिकांकडून सांभाळली जात होती. तालुक्यात एक दोन कंपन्या व्यतिरिक्त कंपनी न वाढल्यामुळे नोकरी आणि धंद्यातही मोठी प्रगती नव्हती. तालुक्यातला मोठ्या संख्येनं असलेला शेतकरी शेती आणि मच्छिमारीत उदरनिर्वाह करीत होता. सिडको उरणात येणार हे निश्चित झालं असताना, कालचं उरण 1986 पर्यंत कालच्याच अवस्थेत असल्यानं त्या परिस्थितीला कालचं उरण 1986 नंतर म्हणण्यासाठी पुढील कारणं पुढे येऊन बदल होत गेला.

**शेतजमीन ताब्यात घेणं सुरु :** सरकारनं दहशतीच्या जोरावर शेती घेतली. सानुग्रहासह 27000 हजार रुपये एकरी भाव देण्याचं उरणातील मेट्रो सेंटर शेतीचे पैसे घेण्यासाठी भाऊबहिणी आई-वडील जमा होऊ लागले. काल परवा गावाकचा अचानक येणारा गावकरी दररोज उरणात येऊ लागला. शेती गेली तरी अचानक आलेला पैसा क्षणिक असला तरी घराघरामध्ये पैशांचा रुबाब आणत होता. कालपर्यंत 5/10 रुपयात जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या हातात हजारो नि लाखो रुपये आले. चार सहा महिन्याच्या आत दारात दोनचाकी, चारचाकी गाड्या आल्या. सोन्याचे दागिने आणि नवीन घरांचं बांधकाम वाढलं. शेत गेल्याच्या दु:खापेक्षा पैसा आल्याचं सुख उरणात सर्वत्र पसरलेलं दिसू लागलं.

**शेतीचे बांध तोडायला सुरुवात :** सरकार आणि शेतकरी एकीकडे शेतीचे पैसे मोजत होते आणि दुसरीकडे शेतावर बुलडोझर फिरवून सरकार जमीन समाट करत होते. शेतीच्या जागी सपाट मैदान होताना दिसू लागलं. बांध तुटल्यानं माझं शेत दाखवायला जागाच उरली नव्हती. खाडीमध्ये असलेली झाडं तोडून त्यामध्ये मातीचा भराव होऊन काळ्या मातीवर गोड्या लाल मातीचा (मुरुमाचा) थर चढू लागला होता.

**उरणात जेएनपीटी वसाहतीसाठी भराव :** नवघर ते फुंडे गावापर्यंत भराव करण्यासाठी 'भावना' नावाची कंपनी आली. ज्या उरणात 1985 आधी 5/6 ट्रक होते तेथे 1986 नंतर एक वर्षात 100 हून अधिक डंपर माती भरावासाठी आले. शेतकऱ्यांनी आलेल्या पैशात शेतकऱ्यांची शेती ऐवजी नोकरी आणि काही धंदा करता येईल या दिशेनं जाऊ लागली. उरण सोडून काही करता येईल का? ह्याचा विचार त्यांच्या मनात घुसू लागला. भराव झाल्यानंतर जेएनपीटी साठी रहिवाशी इमारतीचं काम सुरू झालं. गावागावांच्या हद्दीवरून भांडणं होऊ नयेत म्हणून सामोपचारानं हद्दीतून गावकरी काम आणि धंदा मिळवू लागले. याच काळात टपोरी बनून पैसे मिळवता येतात याचा अंदाज आल्यानं कधी कामधंदा तर कधी फुटकच्या दबावातून पैसा मिळविण्यासाठी तरुण पोरांच्या टोळ्या बनत गेल्या. शेकडो इमारतीची वसाहत 3 वर्षा उभी राहिली.

प्रकल्पामुळे शेवे आणि हनुमान कोळीवाडा ही दोन गावे उठवली गेली. शेवा आणि हनुमान कोळीवाडा या दोन गावांच्या हद्दीत न्हावा शेवा उत्पादनाचं मुख्य क्षेत्र आल्यानं ही गावं उठविण्याचं काम करण्यात आलं. या दोन गावांसाठी बोकडविड्याच्या पालकी खाडीमध्ये शेवेगाव वसविण्यास जागा दिली. आणि हनुमान

कोळीवाड्यानं मच्छिमारीचा धंदा करता यावा म्हणून मांगिरदेव मंदिराजवळ गावाला जागा घेतली. तसंच शेवेगावातील 40 कुटुंबानी शेवेगावात किंवा हनुमान कोळीवाड्यात घरं बांधण्याऐवजी नागाव येथील जीवनमुक्त स्वामींच्या मठीजवळ अंबिकावाडी वसवून ते राहू लागले.

नवीन रस्ते बांधकाम सुरू झाले : उरण पनवेल हा मुख्य रस्ता. हा रस्ता मातीखाडीचाच रस्ता होता. त्याचं डांबरीकरण होऊन करळ येथून शेवेगावाकडे जाणारा रस्ता आणि उरण ते शेवा मार्गाचा रस्ता हे पक्के रस्ते बनविण्यात आले. संपूर्ण भागात भरावाचं काम सुरू झालं होतं. आता गावांना प्रत्येक गावात 5/6 गाड्यावाले, धंदेवाले शेठ दिसू लागले. काल ज्यांच्या गळ्यात सुताच्या धाग्याचा गंडा होता तेथे सोन्याच्या वाघनखातले गोफ, हातात चार चार अंगठ्या, तळे, शेत नवीन बांधलेल्या रस्त्यावरुन गाड्यातून जाता येता दिसू लागले.

जेएनपीटी बंदराची उभारणी: 1986 मध्ये जेएनपीटी बंदराचे जेटी बांधण्याचं काम मिठसुई सह 17 कॉन्ट्रक्टर कंपन्यांनी सुरु केले. डोंगर फोडून भराव, सोबत बंदराचे कन्स्ट्रक्शन, निवासी व्यवस्था, रस्ते सारी काम एकाचवेळी सुरु झाली.

गावांचं रुप बदलत गेलं : 1985 पर्यंत गावामध्ये बहुतांश साधी घरं होती. काही घरं कुडाची आणि छतावर गवत असलेली. झोपड्यासारखी घरांच्या गावांची वसाहत होती. त्याच गावामध्ये प्रत्येक घर भिंतीचं तर झालंच परंतु एक दोन मजली स्लॅबची घरं उभी राहिली. गावामध्ये एक मंदिर. तेवढीच लोकांना जमायची जागा. तेथे गावात वेगळं सभागृह आलं. मोठ्या शाळा आणि स्मशानं झाली. गावात येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांची वर्दळ वाढली.

गावातल्या दावणी गेल्या: गावामध्ये दुधदुभत्यासाठी गाई शेतासाठी बैल सांभाळली जात होती. आता गुरांना चरायला गुरचरण नसल्यानं शेतकऱ्यांनी आपली जनावरं जंगलात सोडून दिली किंवा मोकाट सोडून दिली. ज्या गावात 100/150 जनावरं होती त्या गावात एकही गाय बैल राहिली नाही. बैलगाडी तर गावातून कधीच हद्दपार झाली होती.

पूर्वीची गावकी व्यवस्था संपली : गावातला न्याय गावात होण्यासाठी गावकी ही व्यवस्था होती. तिला ग्रामस्थ मंडळ म्हटलं जाई. गावकी तंटेबखेडे त्या गावकीमध्ये सोडविले जाऊन गावसुधारणा करण्याचा प्रयत्न केला जाई. महालण या 12 गावांच्या संघटनेत वरचं कोर्ट या पद्धतीनं न्याय होत असून चोरी आणि घटस्फोटाचे न्याय देखील महालण सभेमध्ये होत होते. बऱ्याच वेळा ज्याची काठी त्याची म्हैस अशा पद्धतीनं न्याय होत होते. परंतु एक व्यवस्था म्हणून गाव निवाड्याकडे पाहिलं जात होतं. ती गावकी प्रथा फक्त आत्ता धार्मिक सण साजरी करण्यापुरती उरली.

लग्नप्रथा: घराघरांमध्ये शेतीचा पैसा आल्यानंतर लग्नप्रथेमध्ये फारच मोठा बदल झाला. नवरी मुलीच्या मणी मंगळसुत्रात दागिण्यांचा खर्च घरातल्या माणसांचे ठराविक कपडे वगळता 30/40 हजारात लग्न उरकलं जात असे. घरासमोरच्या छोट्या मंडपात लग्न उरकलं जाई. ती साधेसुधेपणाची प्रथा पैशानं साफ धुवून काढली. घरासमोरच्या मंडपातले लग्न मोठ्या हॉलकडे होऊ लागलं. पूर्वीचा कुटुंबाला घेऊन कपडे घेण्याचा प्रकार (बस्ता बांधणे) जाऊन घरातला एकदोन जण जाऊन सामान कपडे आणू लागला. नवरीचे दागिने वाढले. आईचेही दागिने वाढले. चहापाणी झालं की लग्नाचा विधी होण्याआधी नव्या पद्धतीचा साखरपुडा हा मोठा सोहळा आला. साखरपुडयासाठी जी दोन्ही घरची आठदहा माणसं जमायची तेथे 500/1000 माणसं लग्नासारखी नटून थटून जाऊ लागली. मटणाचं जेवण 2000/3000 रुपायाच्या खर्चाऐवजी लाख दीडलाख खर्च करणारा याच उरणातला लग्नातील प्रकार बनला. कालचं लग्न कवड्यांचं होतं आजचं लग्न कोट्यांचं झालं.

मांडवप्रथा: लग्नाआधीचा दिवस म्हणजे मांडवाचा दिवस म्हणतात. ती मांडवप्रथा, फक्त नात्यातल्या लोकांसाठी होती. घरातील कुळदैवतांची नवरा किंवा

नवरीकडून पूजा केली जायची. बाहेरचे पाहुणे क्वचितच येत असत. 1986 नंतर मांडवप्रथा खोट्या प्रतिष्ठेचं आणि रानटीपणाचं रुप बनलं. कुळदैवताचा विधी दिवसा घाईगर्दीत उरकून रात्रीला येणाऱ्या पाहुण्यांच्या दारुमटणाची सोय करायची म्हणजे मांडव घालण्याचं खोट्या प्रतिष्ठेचं कार्य सुरु झालं. जेथे नात्यातली 5/10 माणसं यायची तेथे दारु पिण्यासाठी, मटण खाण्यासाठी आणि डीजेवर रात्रभर दारुमटणाच्या चिखलात नाचण्यासाठी 16 वर्षापासूनचा तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात येऊन अतिशय वंगाळ रुप मांडवाला आणलं. एकानं मांडवासाठी एक लाख रुपये खर्च केला तर दुसऱ्यानं सव्वा लाख करणार ही खोट्या प्रतिष्ठेची स्पर्धात्मक मांडवं उरणात सुरु झाली. ही दारु मटणाची रानटी प्रथा बंद व्हावी म्हणून मी 30 वर्षे विरोध करीत आहे. त्या माझ्या कामाला आज कुठे तरी 2/4 टक्के प्रतिसाद मिळतो आहे. भविष्यात ती रानटी प्रथा जाऊन सोज्वळ रुपात ती पुढे येणार आहे.

<u>उरणची गावतळी आणि उरणच्या विहिरी :</u> पूर्वीच्या काळी घरात पैसा नसताना माणसांचे स्वभाव आणि आपलेपणा फार मोठा होता. प्रत्येकजण आपला वाटत होता. एका हाकेला गाव येत होता. पहाटे तीन वाजताच्या कोंबड्यांच्या बांगांनी घराची दारं किर्रकिर्र आवाज करत उघडायची. पावसाळ्यानंतर थंडीत कुडकुडत सकाळपासून दहावाजेपर्यंत अंगाला चिपकत राहायची. घरासमोर शेकोट्या पेटल्या जायच्या. त्या शेकोट्या भोवताली मुलं, स्त्रिया, पुरुष गोलाकार बसून गावगप्पा करीत राहायची, तशाही थंडीत गावातल्या स्त्रिया गाव तळ्यावर पिण्याचं पाणी आणायला जात असत. नवघरचं एक तळं नवघर, कुंडेगाव, पागोटे गावांना पाणी पाजत होतं. जसखारचं तळं गावापासून एक कि.मी. तेथे काठावरच्या मोठमोठाल्या वडांच्या झाडात तळ महालण परिसराच्या नजरेत येत होतं. भेंडखळची, फुंड्याची तळी आज जे फुंडे हायस्कूल आहे त्याच्याजवळ होती. बोकडविड्याचं तळं गावाच्या नैऋत्य दिशेला लपल्यासारखं असायचं. डोंगरी पाणज्याला गावविहिरीचं पाणी मिळे. चिरनेर मधील कातळपाड्याची विहीर आणि मूळपाड्याजवळचं तळं सातपाड्यांना बायांच्या हंड्याच्या आवाजात डचमळायचं. चिरनेरच्या दक्षिणेला एक पाण्याचा लहानसा डोह. त्याला डोरा म्हणत. तेथे पाणी प्यायला माकडं यायची म्हणून त्याला माकडडोरा म्हणत. तो डोरा वाटसरुना पाणी पाजत असे. उरणच्या पूर्व भागात पाण्याचे डोरे आणि विहिरी बांधल्या गेल्या होत्या. बोरखार गाव हे पूर्णपणे खाडीत असल्यामुळे त्या गावाला धाकटी जुई आणि विंधणे येथे अडीच तीन कि.मी. पायपीट करुन यावं लागत होतं. मुळेखंड, करंजा, चाणजे, नागाव, केगाव, मोरा, उरण या भागात तळे आणि विहिरीचं पाणी वापरलं जाई. करंजा उरण रस्त्यावर द्रोणागिरी हायस्कूल जवळचं तळ येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी, रातानतल्या जनावरांसाठी पाणी पिण्याचं ठिकाण होतं. बहुतेक तळ्यांची गुरंढोरं एकाच जागी पाणी पित असत. खोपटे आणि बोरखार या गावांना पाण्याचं मोठ दुर्भिक्ष होतं. उरण शहर आणि इतर भागाला पाण्याची सोय व्हावी. 1943 पासून अजीज वॉटर वर्क्स यांनी उरण व भवरा येथे विहिरी बांधल्या. महरुम महमद इब्राहिम जितेकर अब्दूल हमीद व अब्दूल मजीद, लाला काटे, बापूशेट तुंगेकर, सर डोसा बाई भिवंडीवाला या साऱ्यांचं योगदान फार मोठं आहे. महालण विभागात विहिरीचं पाणी (डोंगरी पाणजे वगळता) नसल्यानं उरणच्या भिवंडीवाला नावाच्या उदार सावकारानं बोकडविरा, नवघर, जसखार येथे चारचार गावांसाठी दगडी 80/90 फूट गोलाकार अतिशय दगडू टाक्या बांधल्या. त्या टाक्यांना उरण येथील भिवंडीवाला गार्डन मधील विहिरीतून पाईपलाईननं पाणी आणलं जाई. ही पाण्याची सोय 1945 च्या दरम्यान करण्यात आली होती.

आज मात्र उरण शहर पूर्ण बदलताना दिसत आहे. सिडकोच्या मदतीने मोठमोठे टॉवर, गृहसंकुल उभारले जात आहे. मुंबईला जोडणारी उडाणपुले, चांगले रस्ते तसेच खुप प्रतिक्षा पाहुन उरण करांना लोकल सेवा सुरु झाली. त्यामुळे नेरुळ-बेलापूर कमी वेळात सुरक्षित प्रवास सुरु झाला आणि हा उरणचा विकास, कायापालट दिवसें-दिवस होतच राहील.

**संकलक : कु. दिव्यल म्हात्रे**
(एम. कॉम)
(आभार - रायगडभूषण प्रा. एल. बी.पाटील)

# रायगडचा सिंह-श्री छत्रपती शिवाजी महाराज

रायगड जिल्हा हे महाराष्ट्रातील पश्चिम विभागातील एक जिल्हा आहे. या जिल्ह्याचे जुने नाव कुलाबा जिल्हा असे होते. जिल्ह्यातील कुलाबानामक किल्ल्यावरुन ते नाव पडले होते. बॅ. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना त्यांनी हे नाव बदलून रायगड असे केले. पूर्वीच्या मराठा साम्राज्याची पहिली राजधानी असलेल्या किल्ल्यावरुन जिल्ह्याचे नाव रायगड असे ठेवण्यात आले. पूर्वीचे नाव रायरी असे होते रायरी हा किल्ला जिल्ह्याच्या अंतर्गत भागात, सह्याद्री पर्वतरांगांच्या पश्चिम घाटाच्या पश्चिमेकडे असलेल्या घनदाट जंगलात आहे. किल्ला म्हटला की छत्रपती महाराजांचा इतिहास आठवावाच लागेल.

छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा पहिला दिवा त्या देवाला, ज्यांच्यामुळे महाराष्ट्राच्या मंदिरात देव शिल्लक आहेत आणि आपण प्रत्येक मराठी सण साजरे करत आहोत, राजे होता तुम्ही म्हणून आज आहोत आम्ही.

सह्याद्रीच्या छाताडातून नाद भवानी गाते काळजात राहती आमुच्या, रक्तात वाहती राजे। तुफान गर्जतो, आग ओकतो', वाघ मराठी माझा सन्मान राखतो, जान ओकतो, तुफान मतीचा राजा। राजे वेळीच शस्त्र उचलले म्हणून ह्या भगव्याचे विश्व राहिले, तुम्ही होता म्हणून आम्ही हें हिंदवी स्वराज्य पाहिले. राजे पंख नाहीत मला पण उडण्याची स्वप्न जरुर बघतो, कमी असलं आयुष्य तरी भरभरुन जगाव वाटतो. तुमचे पोवाडे ऐकून अंगात रक्त सळसळतो.

19 फेब्रुवारी 1630 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला ज्यांचे रायगडचा नव्हे तर महाराष्ट्राचा इतिहास घडविला आणि जगाच्या कानाकोपऱ्यात भगव्या झेंड्यांचे रहस्य दाखविले.

मुघलांच्या कारकर्दीत मराठी माणसांवर व स्त्रियांवर होणारा अत्याचार जाणूनच वयाच्या पाचव्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांना शहाजी राजांनी, तलवारबाजी आणि भालाफेकीचे शिक्षण देण्यास सुचविले तर माता जिजाऊंनी संस्काराचे बाळकडू पाजले. एक वेळा बाळ शिवबा, शहाजी महाराजांच्या मांडीवर बसून नर्तकीचे गाणे ऐकत बसले होते. दासीला निरोप पाठवून बाळ शिवबाला बोलाविण्यात आले. माता जिजाऊने चिमुकल्या बाळ शिवबाच्या कानाखाली मारली आणि कडाडल्या 'याद राख शिवबा तुम्हांला स्त्रिया नाचवायच्या नाहीत तर तुम्हांला स्त्रिया वाचवायच्या आहेत. अवघ्या वयाच्या 16 व्या वर्षी आपली करंगली कापून रक्ताचा अभिषेक घालून स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास बाहेरच्या देशात शिकविला जातो. एक आदर्श राजा म्हणून बोस्टन विद्यापिठात शिवाजी दि मॅनेजमेंट गुरु : 100 मार्कांचा पेपर घेतला जातो तसेच पाकीस्तानात आदर्श शिवाजी राजा हा धडा शिकविला जातो.

मित्रहो छत्रपतीने स्वराज्य घडविल, स्वराज्याचे सुराज्य घडविण्यासाठी आपल्या हातात दिलं परंतु आपल्याला सुराज्य घडविता आलंच नाही कारण आम्हांला छत्रपतीचा मावळा बनताच नाही आला. आधीचा मावळा कसा होता लवकर उठे शत्रूंच्या पाठी सुटे, हात तुटे, पाय मोडे, वेळप्रसंगी डोकं फुटे पण शत्रूचा पिच्छा न सूटे. पण आजचे युवक उशिरा उठे, पोरींच्या पाठी सुटे कानफाट फुटे पण पोरगीचा नाद न सुटे. अरे कसा घडणार शिवाजी, कसा घडणार मावळा. शिवाजी घडविणारी जिजाऊ आता उरलीच नाही. अर्ध्या जिजाऊ तर गर्भातच मारल्या जातात आणि उरलेल्या जिजाऊंची एकच इच्छा असते शिवाजी जन्मावा दुसऱ्यांच्या कुशीत अशी भावना असेल तर कसा घडेल शिवाजी.

आजकाळ शिवजयंती साजरी केली जाते महाराजांसारखी दाढी वाढविली जाते, कपाळावर चंद्रकोर लावली जाते अगदी गाडी पासून ते घरापर्यंत शिवभक्त म्हणून मिरवलि जातात. अरे तुम्ही कसले शिवभक्त, मुळातच शिवाजी महाराजांना भक्तांची गरज नाही तर अनुयायांची गरज आहे. अनुयायी व्हायला कोण तयारच नाही. राजे आम्हांला लाज वाटते, आज आम्हीं शिवजयंतीच्या नावाने शक्तीप्रदर्शनाची हाऊस

भागवितो. पण तुमचा शक्तीवाद आणि युक्तीवाद समजून घ्यायला कुठेतरी आम्ही कमी पडतो. राजे आम्हाला लाज वाटते तुमचा वर्ण बघीतला, विचार बनवायला आम्ही कमी पडलो. राजे आम्हाला लाज वाटते कारण स्वराज्याचे सुराज्य बनवायला आम्ही कमी पडलो. राजे आम्हाला वाटते कारण तुमच्या राज्यात स्त्रियांना मान आणि सन्मान होता पण आज स्त्रियांवर होणारा अत्याचार फक्त आम्ही व्हॉटसॲपवर मेसेजस पाठवून इज्जत घालविल्याशिवाय राहत नाही.

मित्रहो, जागे व्हा आता गुलामगिरीतून सोडविण्यासाठी छत्रपती शिवाजी राजे येणार नाहीत. धर्मासाठी मरायला संभाजी राजे येणारा नाहीत. म्हणून म्हणतो राजे आज तुमची नितांत गरज आहे. या मराठी माणसांना नव्हे तर या रायगड लिल्ह्याला.

तन्वी शिवाजी म्हात्रे (F.Y. BAF.)

---

## माझा रायगड

आसमंत उजलोनी यावे, दाहि दिशांनी गंध पसरावे
एका शुर पराक्रमाची माहिती देत उभा आहे.
फक्त रायगड-रायगड नाद घुमती
रायगड जिल्ह्यात माझा आपुलकीची नाती.
ना धर्म ना भेद फक्त माणुसकी जाती.
विविध कला, विविध क्षेत्र कौतुकीची थाप मिरवती.
अशा या जिव्हाळ्याच्या रायगडात मी असतो अवती-भोवती.
शुर विरांची भूमि भारत माता.
त्यामध्ये रुबाबदार माझा रायगडाची गाथा.
अनेक पराक्रमी शुरांनी रक्त आपली वाहिली.
इतिहास कारांनी नोंद घ्यावी, ही त्याची शैली.
पराक्रमाचा अभिमानाचा एक वेगळा सुगंध या मातीला.
मी शत:श प्रणाम करीतो माझा रायगड भुमिला.

कुणाल कडवे
(M.A. Economics-I)

## रायगड जिल्हातील प्रमुख नद्या

1) उल्हास नदी
2) पातळगंगा नदी
3) बाळगंगा नदी
4) भोगवती (भोगेश्वरी) नदी
5) अंबा नदी
6) कुंडलिका नदी
7) सावित्री नदी



# RAIGAD DISTRICT

**Raigad District: A Blend of History, Nature, and Modernity:**

Raigad District, located in the Konkan region of Maharashtra, India, is a place where history and nature converge magnificently. Named after the Raigad Fort, the former capital of the Maratha king Chhatrapati Shivaji Maharaj, the district not only offers a rich historical narrative but also showcases breathtaking landscapes and a vibrant cultural tapestry.

**Historical Significance:**

The centerpiece of Raigad's historical heritage is undoubtedly the Raigad Fort. Perched atop a rugged hill in the Western Ghats, it offers panoramic views and a glimpse into the life and times of Shivaji Maharaj, who was crowned here in 1674. The fort, accessible by a steep path or a cable car, features several structures that speak volumes about Maratha architecture and the ingenuity of its engineers during that era.

Apart from Raigad Fort, the district is dotted with other historical sites such as the Murud-Janjira Fort, which stands undefeated on an island off the coastal village of Murud. Its architectural prowess and strategic location made it impervious to attacks by Dutch, British, and Portuguese naval forces.

**Natural Splendors:**

Raigad is blessed with a variety of natural attractions. The district's coastline, part of the larger Konkan coast, is lined with pristine beaches such as Alibag, Kihim, and Kashid, popular among tourists for their scenic beauty and tranquil surroundings. Inland, the landscape shifts to lush greenery and dense forests, with the Western Ghats offering numerous trekking and hiking opportunities. The Tamhini Ghat, with its misty valleys and cascading waterfalls during the monsoon, is a nature lover's paradise.

**Cultural and Economic Tapestry:**

The culture of Raigad is a rich amalgam of traditional customs and modern influences. The local cuisine, dominated by seafood and coconut-based curries, reflects the coastal lifestyle. Festivals such as Ganesh Chaturthi are celebrated with great pomp and enthusiasm, showcasing the deep-rooted traditions of the local communities.

Economically, Raigad is a district of contrasts. While agriculture remains a staple, with rice, coconut, and fish being the primary products, the region has also seen significant industrial development. The Maharashtra Industrial Development Corporation (MIDC) has established several industrial zones in the district, which host a range of industries from steel manufacturing to IT services.

**Challenges and Opportunities:**

Despite its natural and historical allure, Raigad faces several challenges such as environmental degradation and the pressures of urbanization. Balancing development with ecological sustainability is a key issue, as is enhancing the infrastructure to support tourism without compromising the natural beauty of the region.

The future of Raigad lies in leveraging its historical and natural assets while ensuring sustainable development. Efforts to preserve its cultural heritage and promote eco-friendly tourism are essential for its continued growth and prosperity.

**Conclusion:**

Raigad District is a microcosm of India's diverse heritage, offering everything from historical forts and tropical beaches to lush hills and vibrant cultural festivals. For those seeking a deeper understanding of India's past or an escape into nature, Raigad offers a compelling destination. As it strides towards a balanced and sustainable future, Raigad continues to captivate and inspire both the casual visitor and the discerning traveler.

**~ IQRA SALIM MUQRI**
(TYBCOM)

# STORY ON RAIGAD DISTRICT

Once nestled in the Western Ghats of Maharashtra, Raigad District boasted landscapes that seamlessly blended historic grandeur with natural splendor. Among its crowning jewels was Raigad Fort, standing atop a rugged hill, wrapped in veils of mist and stories of valor.

This story begins in a small village at the base of the fort, where a young girl named Meera lived. Her fascination with the fort was not just due to its imposing structure but the tales of Shivaji Maharaj, the great Maratha king who made the fort his capital.

One stormy night, as lightning painted the sky with fearsome strokes, Meera's grandfather began a tale that had been passed down through generations. "Many years ago," he started, his voice a mix of mystery and pride, "Shivaji Maharaj stood right at the top of this fort and surveyed his kingdom. But little known is the story of the Veiled Warrior who saved the fort from an imminent attack."

Meera listened, her eyes wide with wonder. The Veiled Warrior, as her grandfather narrated, was a mysterious figure who appeared out of nowhere during a night much like this. With agility and intelligence, the warrior maneuvered through the shadows, using secret passages within the fort to surprise and disarm invaders.

The night passed, and the tale left a burning curiosity in Meera. As dawn broke, she decided to visit the fort. Climbing the steep slopes, navigating through the winding paths shrouded in fog, Meera felt a connection to the stories of the past.

Reaching the top, she explored the ruins, each stone whispering secrets of the old. In her exploration, she stumbled upon a hidden alcove covered in old vines. Pushing the vines aside revealed a small entryway. Heart pounding, Meera crawled through. To her astonishment, she discovered an old, dusty chamber filled with ancient armor and weapons.

Among the artifacts, a veiled helmet caught her attention. As she touched it, she felt a strange sense of familiarity, almost as if the Veiled Warrior was not just a character from her grandfather's stories but a real guardian of Raigad. Overwhelmed with inspiration, she decided to bring the story of the Veiled Warrior to the people of her village.

With permission from local authorities, Meera organized a small exhibition in the village, featuring the artifacts she found. She narrated the story of the Veiled Warrior, emphasizing the values of bravery and intelligence.

The exhibition was a success, drawing attention from historians and tourists, revitalizing interest in Raigad’s heritage. Meera became not just a storyteller but a protector of her heritage, ensuring that the tales of valor and the spirit of the Veiled Warrior lived on.

Thus, through her journey, Raigad's past was kept alive, intertwined with its present, inspiring generations to cherish and preserve their history. And so, Raigad Fort stood, not just as a monument of stone, but as a beacon of stories and dreams nurtured by its people.

**~ IQRA SALIM MUQRI**
(TYBCOM)

## RAIGAD DISTRICT

In the lap of the Sahyadris, Raigad stands,
A bastion high, wrought by nature’s hands.
Where rivers swirl through the lush embrace,
Of verdant hills and the earth’s soft face.

Majestic fort, perched on eagle's crest,
Whispers tales of Shivaji’s quest.
Echoes of footsteps, a royal tread,
In corridors where once kings led.

The green quilt of paddy fields spread wide,
Monsoon’s brush on the mountainside.
Mango orchards, the air sweet and ripe,
Nature’s bounty, of every type.

Waterfalls cascade with thunderous roar,
Through mists that the winds before them bore.
And in the quiet of a dappled dawn,
The peacock struts on a dewy lawn.

Temples old, with stories to tell,
Where prayers float up and blessings dwell.
Crafted hands of the local loom,
Weave the threads of a cultural bloom.

Raigad, oh land where histories merge,
Of Maratha valor, and cultural surge.
Still standing proud under the sun’s fiery gold,
A saga of glory, eternally told.

**~IQRA SALIM MUQRI, (TYBCOM)**

## A TOWN BY THE SEA

In Maharashtra's land, by the sparkling sea,
Lies a town called Uran, where life flows free
With waves that dance and skies so bright,
Uran shines like a gem in sunlight

Fisherman's boats Bob in the gentle breeze
Bringing in their catch from the deep blue seas
Salt fills the air, it's the smell of the shore,
Uran's charm is something to adore

Oh!Uran ,with your salt-scented air,
Where trade wind onced carried tales rare.
Portuguese chores whispers of the past,
In your Harbor's embrace they forever last.

Houses painted bright with doors open wide,
Welcoming neighbours with arms spread wide.
Portuguese ship once docked at the bay,
Leaving behind stories that still hold sway

Maratha valor, kokanis stride,
Uran's saga, told with pride
In your arms we find peace and cheer
Uran, Oh Uran, we hold you dear

**Muhammad Yasir Bin Nadeem Naziri**
**(F.Y.B.A.F)**